# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. १०/०२/२०१७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १०/०२/२०१७ रोजी सभा सुचना क्र. १३ दि. ०९/०२/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दु. १२.३० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रभाकर म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

<u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | मा. सभापती |
| २. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ३. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ४. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ५. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ६. | श्री. राकेश रतिशचंद्र शहा | सदस्य |
| ७. | श्री. यशवंत ठकाजी कांगणे | सदस्य |
| ८. | श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली | सदस्या |
| ९. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १०. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| ११. | श्रीम. झिन्नत रऊफ कुरेशी | सदस्या |

<u>गैरहजर सदस्य– निरंक</u>

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| २. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ३. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| ४. | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | सदस्या |
| ५. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

मा. सभापती :-

सर्व सदस्यांना नमस्कार. नगरसचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ११७, सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ ‘‘अ’’ + ‘‘क’’ + ‘‘अंध व अपंग’’ + ‘‘महिला व बालकल्याण’’ + ‘‘JNNURM’’ + ‘‘P’’ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. प्रकरण क्र. ११८, सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे ‘‘अग्निशमन अंदाजपत्रक’’ मा. स्थायी समितीस सादर करणे. प्रकरण क्र. ११९, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. प्रकरण क्र. १२०, शिक्षण विभागाचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. प्रकरण क्र. १२१, परिवहन सेवेचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

मा. उपायुक्त (मु.) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समितीचे सभापती श्री. प्रभाकर म्हात्रे व सर्व सन्माननीय स्थायी समिती सदस्य, उपस्थित कर्मचारी, अधिकारी वर्ग यांचे स्वागत करुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ अन्वये महानगरपालिकेच्या कोणत्याही करात अथवा दरात वाढ न करता नागरी सुविधा परिणामकारक राबविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध असणारा सन २०१६-१७ चा सुधारीत व सन २०१७-१८ चा मुळ अर्थसंकल्प मा. स्थायी समितीच्या मान्यतेस सादर करणेत येत आहे.

महानगरपालिकेची अर्थव्यवस्था पाहता मागणी व पुरवठा या मधील अंतर वाढतच असून शहर सौंदर्यीकरण, औद्योगिकीकरण व नागरीसुविधा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. याकरिता उत्पन्नाची बाजू अत्यंत महत्वाची असते. त्यातील वाढ/घट याचाही विचार करणे तितकेच महत्वाचे आहे. महत्वाकांक्षी योजना आपण राबवित आहोतच त्यामध्ये नागरी सेवा-सुविधांच्या योजनांची अंमलबजावणी देखील सुरु आहे. लोकाभिमुख प्रशासनाची गती झपाटयाने वाढत असून त्या अनुषंगाने गतिमानता आणणे आवश्यक आहे.

वरील पार्श्वभूमी पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५(अ) अन्वये अर्थसहाय्य देऊन पुरविण्यात आलेल्या सेवांबाबतचा सन २०१५-१६ चा अहवाल आपणा समोर सादर करीत आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे. अर्थसहाय्य देऊन पुरविण्यात आलेल्या सेवांमध्ये दिवसेंदिवस वाढत जाणारी तुट विचारात घेता ही तुट भरुन काढण्याच्या उपाययोजनांची अंमलबजावणी न झाल्यास भविष्यात अशा मुलभुत सेवा पुरविणे कठीण होऊन बसेल. यासाठी महानगरपालिकेच्या कर व दरात वाढ करणे अनिवार्य आहे. महानगरपालिका क्षेत्रातील वाढती निवासी व व्यापारी संकुले, वाढती लोकसंख्या त्या अनुषंगाने पुरवाव्या लागणाऱ्या नागरी सेवा सुविधा यावर होणारा खर्च व महापालिकेचे मर्यादित उत्पन्न यांचा तुलनात्मक विचार करता आवश्यक नागरी सेवासुविधा पुरविणे मर्यादित उत्पन्नातून शक्य नाही.

तसेच मागील काही वर्षात महापालिकेने कोणतीही करवाढ केली नसल्याने उपलब्ध निधी व शहराच्या गरजेनुसार पुरवावयाच्या मुलभुत सेवा सुविधा यांची सांगड घालून आवश्यक सेवा शहरवासियांना उपलब्ध करुन देणे ही बाब जिकरीची होत असल्यामुळे मोठया खर्चाची भांडवली स्वरुपाची, नागरी सुविधांची कामे वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन करावी लागत आहेत.

आजतागायत रक्कम रु. २३३ कोटी इतके कर्जाचे दायित्व असून सद्या सुरु असलेल्या योजनांसाठी मंजूर कर्जापैकी आवश्यकतेनुसार कर्ज उचलण्यात येत आहे. याचेही दायित्व पुढील वर्षात रक्कम रु.१२९ कोटीने वाढणार आहे. या वर्षीदेखील कर्ज घेण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. भविष्यात कर्जाची परतफेड करणे, कर्ज परतफेड क्षमता राखणे यासाठी महानगरपालिकेस स्वतःचे उत्पन्न वाढविण्याशिवाय गत्यंतर नाही अन्यथा कर्ज परतफेड क्षमता नसल्याकारणाने वित्तीय संस्था (योजना/प्रकल्प यासाठी) कर्ज देण्यास इच्छुक राहणार नाहीत.

## अर्थसंकल्पातील उत्पन्न व खर्चाच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

### उत्पन्नाच्या ठळक बाबी

(आकडे कोटीत)

| | | |
|---|---|---|
| १. | स्थानिक संस्था कर (LBT) | २१२.६० |
| २. | मालमत्ता कर | १०१.७३ |
| ३. | पाणीपट्टी | ६४.०० |

| | | |
|---|---|---|
| ४. | विकास आकार | ५०.०० |
| ५. | बाजार फी | ६.६२ |
| ६. | जाहिरात/फलक | ५.२० |
| ७. | विशेष शिक्षण कर | ५.०९ |
| ८. | वृक्षकर | ३.५२ |
| ९. | अग्निशमन सेवा कर/कॅपिटेशन फी | ९.५६ |
| १०. | कर्ज (MMRDA) १. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान<br>A) एकात्मिक-नाले बांधकाम (२७.२४) B) सिमेंट रस्ते बांधकाम ( ८०.००)<br>२. भुयारी गटारे योजना<br>३. ७५ एम.एल.डी.नविन पाणी योजना<br>४. अमृत योजना | <br>१०७.२४<br>४८.००<br>३४.००<br>६०.०० |

# खर्चाच्या ठळक बाबी

(आकडे कोटीत)

| | | |
|---|---|---|
| १ | भुयारी गटार योजना | ७३.८० |
| २ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान | |
| | अ. पर्जन्य जलवाहिन्या टप्पा क्र.२ | ९२.०० |
| | ब. सिमेंट रस्ते बांधकाम | १८०.०० |
| ३ | नविन ७५ एम.एल.डी. पाणी योजना | १४२.७२ |
| ४ | अमृत योजना | १२०.०० |
| ५ | वृक्ष प्राधिकरण अंदाजपत्रक | ३८.१० |
| ६ | शिक्षण विभाग अंदाजपत्रक | २१.१२ |
| ७ | महिला व बाल कल्याण अंदाजपत्रक | ४.०० |
| ८ | अंध व अपंग कल्याण अंदाजपत्रक | १.०० |
| ९ | अग्निशमन इमारत बांधकाम, वाहने, यंत्रसामुग्री इत्यादी | २१.०० |

| | | |
|---|---|---|
| १० | आपत्ती व्यवस्थापन | १३.२५ |
| ११ | वार्ड सफाई | ७५.०० |
| | घनकचरा व्यवस्थापन | १४.०० |
| १२ | भाईंदर स्टेशन सब-वे | ८.०० |
| १३ | नविन रस्ते/गटारे बांधकाम | १०.०० |
| १४ | मार्केट बांधकाम | १०.०० |
| १५ | श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा,रस्ता रुंदीकरण/सुशोभिकरण | ४.०० |
| १६ | संगणकीकरण (नागरी सुविधा) | ३.५० |
| १७ | नाट्यगृह बांधणे | २.०० |
| १८ | दुर्बल घटक | १.०० |
| | | |

| | |
|---|---|
| १) | **भुयारी गटार योजना**<br>मिरा-भाईंदर शहरामध्ये राबविण्यात येत असलेली JNNURM अंतर्गत भुयारी गटार योजना यावर्षी पुर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात असून, यासाठी यावर्षी लागणाऱ्या खर्चाची तरतूद म्हणून अंदाजपत्रकात **रक्कम रू. ७३.८० कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. |
| २) | **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान**<br>**अ) महाराष्ट्र सुवर्ण जयंती (पर्जन्य जलवाहीन्या)**<br>महाराष्ट्र सुवर्ण जयंती पर्जन्य जलवाहीन्या टप्पा क्र.०१ चे काम पुर्ण झालेले असून टप्पा क्र.०२ बाबत प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. यासाठी शासन अनुदान व महानगरपालिका स्वनिधीतून खर्च करावा लागणार असल्याने यासाठी यावर्षीच्या अंदाजपत्रकात **रक्कम रु. ९२ कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.<br>**ब) सिमेंट रस्ते बांधकाम**<br>महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत मिरा भाईंदर शहरातील सिमेंट रस्ते बांधणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन अनुदान + महानगरपालिका हिस्सा यासाठी यावर्षी होणारा खर्च विचारात घेता **रक्कम रु. १८० कोटी** इतकी तरतूद अर्थसंकल्पात करण्यांत आलेली आहे. |
| ३) | **नविन ७५ एम.एल.डी. पाणी योजना**<br>मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरणाकडून ८६ **MLD** तसेच **MIDC** कडून **५० MLD** पाणीपुरवठा असा एकूण **१३६ MLD** पाणीपुरवठा होत आहे. सद्यस्थितीत **१७२ MLD** शहरास गरज असल्याने नविन ७५ **MLD** पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानातंर्गत हाती घेण्यात आलेली आहे. सदरची योजना प्रगतीपथावर असून लवकरात लवकर शहरास याद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. यासाठी **रक्कम रु.१४२.७२ कोटी** इतकी तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. |
| ४) | **अमृत योजना**<br>केंद्र शासनाचे अमृत योजनेतंर्गत पाणीपुरवठा वितरण व्यवस्था टप्पा क्र.०२ ची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. यासाठी अर्थसंकल्पात **रक्कम रु. १२० कोटी** इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. |
| ५) | **वृक्षप्राधिकरण अंदाजपत्र**<br>महापालिका क्षेत्रातील वृक्षांचे संवर्धन/संरक्षण करणे सामाजिक वनीकरण याबाबत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन/उद्याने विकास या अंदाजपत्रकात **रक्कम रू.३८.१० कोटी** इतकी तरतूद करणेत आलेली आहे. |
| ६) | **शिक्षण विभाग अंदाजपत्रक**<br>महापालिका शिक्षकांचे ५०% वेतन व शाळा इमारती देखभाल/दुरुस्ती, नविन शाळा बांधणे व इतर शालेय सामुग्री खरेदी करणे यासाठी शिक्षण विभागाचे **रक्कम रु. २१.१२ कोटी** इतक्या रकमेचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. |
| ७) | **महिला व बालकल्याण**<br>मागासवर्गीय वसाहतीमध्ये सेवा व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच महिला व बालसंगोपन यासाठी शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्नातून अत्यावश्यक सेवांवरील खर्च वजा जाता उर्वरित उत्पन्नांवर ५% तरतुद ठेवणे बंधनकारक असून यावर्षी महिलांसाठीच्या नव-नविन योजना अंमलात आणणेसाठी **रक्कम रू. ४ कोटीची** तरतुद अर्थसंकल्पात करणेत आलेली आहे. |
| ८) | **अंध व अपंग** |

| | |
|---|---|
| | मिरा-भाईंदर क्षेत्रामधील शारिरीक दृष्टया अंध व अपंग असलेल्या नागरीकांकरिता विकासाच्या विविध योजना राबविण्यासाठी अंध व अपंग अंदाजपत्रकात **रक्कम रु. १ कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. |
| ९) | **अग्निशमन अंदाजपत्रक**<br>शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता अग्निशमन दल सुसज्ज आणि अधिक कार्यक्षम करण्यासाठी नविन इमारत बांधकाम/नविन तंत्रज्ञानानुसार शहरातील भौगोलिक स्थिती विचारात घेऊन नविन टेक्नॉलॉजीचे अग्निशमन वाहन व इतर सामग्री खरेदी करण्यासाठी सन २००६ चे आग प्रतिबंधक कायद्यानुसार अग्निशमन विभागाचे स्वतंत्र **रक्कम रू. ३१.७० कोटीचे** अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. |
| १०) | **आपत्ती व्यवस्थापन**<br>शहरातील गुन्हेगारीस आळा बसविण्यासाठी स्थानिक पोलिस विभागाच्या सहकार्याने आवश्यक त्या ठिकाणी C.C.Tv कॅमेरे बसविण्यांत येणार आहेत. अचानक उद्‌भवणारी संकटे/नैसर्गिक आपत्ती यावर नियंत्रण आणण्यासाठी **आपत्ती नियंत्रण कक्ष** स्थापन करण्यांत आलेला आहे. यासाठी या वर्षाचे अर्थसंकल्पात **रक्कम रु.१३.२५ कोटी** इतकी तरतूद करण्यांत आलेली आहे. |
| ११) | **साफ-सफाई /घनकचरा व्यवस्थापन**<br>मा.सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार तसेच **"स्वच्छ भारत अभियानांतर्गत"** शहरात कार्यक्षम घनकचरा व्यवस्थापन, यामध्ये ओला व सुका कचरा यावर प्रक्रिया व विल्हेवाटीची कार्यप्रणाली राबविण्यासाठी **रक्कम रू.८९ कोटी** इतकी अंदाजपत्रकात तरतूद करणेत आलेली आहे. |
| १२) | **भाईंदर स्टेशन सब-वे.**<br>मिरा-भाईंदर शहरातील मुख्य हमरस्त्यावरिल वाहतुकीची समस्या लक्षात घेता भाईंदर (पूर्व/पश्चिम) जोडणारा जेसलपार्क सब-वे चे काम हाती घेण्यात आलेले होते. सदरचे काम प्रगतीपथावर असून अंतिम टप्प्यात असल्याने या वर्षी सदरचा सब-वे शहरवासियांना खुला होणार आहे. यावर्षीच्या अंदाजपत्रकात यासाठी **रक्कम रू. ८ कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. |
| १३) | **नवीन रस्ते/गटारे**<br>मा.सुप्रिम कोर्टाचे निर्णयानुसार शासनाच्या मंजूरीने रस्ते व गटार बांधकामामध्ये ज्या खाजगी जागा बाधित होत असतील त्या जागामालकांना **F.S.I/T.D.R.** देऊन त्यांचेकडूनच रस्ते व गटारे ही महत्वाची कामे विकसित करून घेण्यात येणार आहेत. या व्यतिरिक्त नविन रस्ते/गटारे बांधकामासाठी **रक्कम रू १० कोटी** इतकी तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. |
| १४) | **संगणकीकरण (नागरी सुविधा)**<br>नागरीकांची कामे शिघ्रगतीने व्हावी. नागरीकांचा वेळ, श्रम व पैश्याची बचत व्हावी. तसेच करदात्यांना आपला कर भरण्यासाठी रांगा लावून कर भरावा लागू नये म्हणून Online सुविधेबरोबरच ECS सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने अंदाजपत्रकात **रक्कम रू ३.५० कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. |
| १५) | **मार्केट बांधकाम**<br>आरक्षण क्र.२३१ या जागेवर मार्केट इमारत बांधकाम सुरु करण्यात आलेले होते. सदरचे काम हे अंतिम टप्प्यात असून यासाठी अर्थसंकल्पात रक्कम **रु. १० कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. |
| १६) | **श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळा,रस्ता रुंदीकरण/सुशोभिकरण**<br>मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावरील श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळयाच्या सभोवतालचा रस्ता उंच झाल्याने तसेच राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलामुळे पुतळयाच्या सौंदर्यात अडथळा निर्माण झाला असल्याने याकरिता तांत्रिक सल्लागार नेमून पुतळा रस्त्याच्या मध्यभागी स्थलांतरीत करणे, पुतळयाच्या चबुतऱ्याची उंची वाढविणे, सभोवतालच्या उद्यानाचे सुशोभिकरण करणे यासर्व आवश्यक कामांसाठी अर्थसंकल्पात रक्कम **रु. ४ कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. |
| १७) | **नाटयगृह बांधणे** |

| | |
|---|---|
| | मिरा-भाईंदर शहरास नाट्य संस्कृतीची परंपरा आहे. परंतु शहरात एकही नाट्यगृह नसल्याने नाटयरसिकांची गैरसोय होत आहे. शहरातील नाट्य संस्कृती वृध्दिंगत करणे व नाट्यरसिकांना नाट्य परंपरेचा अधिकाधिक आस्वाद घेता यावा याकरिता आरक्षण क्र.२१८ मधील काम लवकरच पुर्ण होणार आहे. तसेच आरक्षण क्र.२४१ मधील नाटयगृहाचे काम प्रस्तावित आहे. यासाठी यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये **रक्कम रु. २ कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. |
| १८) | **दुर्बल घटक**<br>महानगरपालिका क्षेत्रातील दुर्बल घटकांना रस्ते, वीज, आरोग्य विषयक सेवा-सुविधा तसेच पाणी-पुरवठा या मूलभूत सेवा पुरविण्यासाठी अर्थसंकल्पात **रू. १ कोटी** तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. |

महानगरपालिकेची अपेक्षित जमा बाजु लक्षात घेता सन २०१६-१७ चा सुधारित अर्थसंकल्प रु. १३८९.०६ लक्ष जमा व रु. १३१०.३५ लक्ष खर्च तसेच **सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक जमा रु. १४४२ कोटी ८९ लक्ष २८ हजार व खर्च रु.१४४२ कोटी ७३ लक्ष ६८ हजार व रु.१५ लक्ष ६० हजार शिल्लकीचा, कोणतीही करवाढ व दरवाढ नसलेला अर्थसंकल्प मा. स्थायी समितीस सादर करण्यात येत आहे.**

सदर अंदाजपत्रक तयार करतांना शहराचा होणारा भावी काळातील विकास तसेच परिसरात होणारी वाढ लक्षात घेतली आहे. अंदाजपत्रकीय वर्षात प्राप्त उत्पन्नातुन शहरातील सर्वच घटकांना दिलासा देण्याचे ध्येय समोर ठेवले आहे.

मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा. सभागृह नेते, मा. विरोधीपक्ष नेते, व सर्व सन्माननीय सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्ग शहरातील व शहराबाहेरील विचारवंत, वृत्तप्रतिनिधी हे मला वेळोवेळी बहुमोलाचे सहकार्य करत असतात त्याबद्दल मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. अर्थसंकल्पातील उद्दीष्ट पुर्तीसाठी सर्वांचे असेच सहकार्य लाभेल अशी अपेक्षा करतो.

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ११६, मौजे उत्तन, पाली येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाकरीता DBFOT तत्वावर प्राप्त झालेली निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

**राकेश शहा :-**

**उपरोक्त विषयाची संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने पूर्ण माहितीसह सदरचा विषय सोमवार दि. १३/०२/२०१७ रोजीच्या स्थायी समितीच्या विशेष सभेत घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.**

**यशवंत कांगणे :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**शरद पाटील :-**

**ह्या विषयाचा गोषवारा चूकीचा आहे.**

**शर्मिला बगाजी :-**

**मा. सभापतींच्या परवानगीने आपण ह्यांना ७ वर्षांचे देतो. त्यांना दोन वर्षाचे दिले तर............**

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

**दोन वर्षांचे करायला ते तयार नाहीत.**

**मा. सभापती :-**

**प्रकरण क्र. ११६ ह्या विषयाची चर्चा सोमवारी १०.०० वाजता करण्यात येईल.**

**सभा तहकुबी ठराव क्र. ११०अ :-**

मौजे उत्तन, पाली येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाकरीता DBFOT तत्वावर प्राप्त झालेली निविदेस मंजूरी मिळणेबाबत विषयाची संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने पूर्ण माहितीसह सदरचा विषय सोमवार दि. १३/०२/२०१७ रोजीच्या स्थायी समितीच्या विशेष सभेत घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. राकेश शहा        अनुमोदन :- श्री. यशवंत कांगणे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

(सभा संपण्याची वेळ दु. ०१.०० वाजता)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका